

संस्कृत सुभाषित

*आयुः कीर्तिश्च वित्तं च*
*विद्या यशश्च वर्धताम्।*
*नूतनं वर्षमेतानि*
*वरदानानि ददातु वः।।*

या श्लोकाचा अर्थ वाचा पान ६ वर

PTVA Schools

# दर्पण

For private circulation only



**नाताळच्या हार्दिक शुभेच्छा!**

नाताळ म्हणजे ख्रिसमस, जो जगभरात २५ डिसेंबर रोजी प्रभू येशू ख्रिस्ताचा जन्मदिन म्हणून साजरा होणारा एक मोठा ख्रिस्ती सण आहे, ज्यात आनंद, प्रेम आणि भेटवस्तूंची देवाणघेवाण होते.

Nov-Dec 2025

## Guest Editorial

# "मन शांत असेल, तरच शब्दांना सौंदर्य येतं"

प्रिय मुलांनो आणि पालकहो,

मुलांना राग आला की आपण अनेकदा म्हणतो, "चिडू नकोस, शांत बस!" पण खरं सांगू? राग दाबून नाही, समजून कमी होतो. १०-१५ वयोगट हा मेंदू-विकासाचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. या काळात भावनांचे नियंत्रण सांभाळणारी prefrontal cortex अजून परिपक्व होत असते. म्हणूनच राग, चिडचिड, चटकन उत्तरं देणं — हे वाढीचा नैसर्गिक भाग आहे. पण सततचा स्क्रीन-टाइम या प्रक्रियेला विस्कळीत करतो. झोपण्याच्या १ तास आधी मोबाईल पाहिल्यास मेलाटोनिन ३० टक्के घटते; झोप तुटक झाली तर एकाग्रता २५-३० टक्के कमी होते आणि चिडचिड ७० टक्के वाढते.

अशाच एका ११ वर्षांच्या आदित्यची आठवण सांगते. रात्री उशिरापर्यंत गेम्स, सकाळी थकवा, दिवसभर उदासीनता. त्याला मी म्हटलं, "मन शांत करण्याचं power button तुझ्या श्वासात आहे. १५ दिवस सकाळी ३० मिनिटं चालून बघ." तो तयार झाला आणि त्याच्या चेहरेरेषा, झोप, मन:शांती यांत सुंदर बदल दिसला. कारण मैदानी activity मुळे सेरोटोनिन ३० टक्के आणि डोपामिन २० टक्के वाढते, ही मन शांत आणि स्थिर करणारी नैसर्गिक रसायनं.



पालकहो, मुलांना "आदर कर" असं सांगण्यापेक्षा आपण आदर दाखवणं त्यांना जास्त शिकवतं. रोज १०-१५ मिनिटं समजून घेणाऱ्या गप्पा मारल्या, "काय छान वाटलं? काय कठीण गेलं?" विचारलं की मुलांच्या मेंदूत ऑक्सिटोसिन २०-३० टक्के वाढतं, हे नात्यात विश्वास आणि सुरक्षितता निर्माण करणारा हार्मोन.

भावना ओळखून त्यांना नाव देणं हे भावनिक संतुलनाचं पहिलं पाऊल. रागाच्या क्षणी ४-६ खोल श्वास घेतल्यास हृदयाचे ठोके कमी होतात, कोर्टिसोल घटतं आणि मेंदूला विचार करण्यासाठी काही क्षण मिळतात. त्या क्षणांतच प्रतिक्रिया नव्हे तर योग्य प्रतिसाद जन्माला येतो.

मुलांनो, लक्षात ठेवा, "राग आला" हे मान्य करणं ही कमजोरी नाही, तर स्वतःच्या भावनांवर प्रकाश टाकण्याची ताकद आहे. आणि पालकांनो, तुमचा संयम ही मुलांची पहिली ध्यानशाळा आहे.

शरीराला हालचाल, मनाला विश्रांती, भावनांना संवाद आणि नात्यांना आदर - हे चार नियम पाळले, की घरात वाद कमी आणि ऊब वाढते. आणि ऊब वाढली की संस्कार खोल रुजतात.

**- डॉ. मंजिरी पुराणिक**
**Doctor, author, podcaster, lifestyle coach**
**पार्ले टिळक विद्यालय मराठी (माजी विद्यार्थिनी बॅच १९८०)**

# टिळक ट्रॉफी आंतरशालेय क्रीडा सामने उत्साहात

पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनतर्फे २२ नोव्हेंबर २०२५ रोजी पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाच्या मैदानावर टिळक ट्रॉफी आंतरशालेय क्रीडा सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. ४७ वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीनंतर यंदाच्या ४८ व्या वर्षातही मोठ्या दिमाखदार सोहळ्याने या आंतरशालेय क्रीडा सामन्यांचे उद्घाटन करण्यात आले.

या उद्घाटन सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाचे माजी विद्यार्थी ज्यांनी जलतरण क्षेत्रातील डायव्हिंग या क्रीडा प्रकारात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. तसेच २०१६-१७ या वर्षीच्या महाराष्ट्र शासनाच्या शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराने सन्मानित केलेले तुषार गीतये यांना आमंत्रित करण्यात आले होते.

पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनचे अध्यक्ष श्री. गानू सर, सहकार्यवाह श्री. भाटवडेकर सर, श्री. धुरंदर सर, श्री. दांडेकर सर तसेच संचालक मंडळातील सर्व मान्यवर, मुख्य शैक्षणिक अधिकारी सौ. जान्हवी खांडेकर आणि सर्व शाळांचे मुख्याध्यापकही यावेळी उपस्थित होते. प्रमुख अतिथींनी ध्वजारोहण करून क्रीडाज्योत प्रज्वलित केली. त्यानंतर पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या विविध शाळांतील राज्य व राष्ट्रीय पातळीवर २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या क्रीडापटूंना सन्मानित करण्यात आले. त्यांच्या कामगिरीने संपूर्ण संस्थेचा अभिमान वाढला. त्यानंतर सर्व उपस्थित खेळाडूंना प्रोत्साहित करण्यात आले. यंदा ६० शाळांतील एकूण १४०१ विद्यार्थ्यांनी टिळक ट्रॉफी क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतला.





कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, फुटबॉल तसेच यंदाच्या वर्षीपासून बास्केटबॉल या क्रीडा-प्रकारांचे सामने उत्साहात झाले. विजयी संघांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या पारितोषिक वितरण समारंभास विलेपार्ले पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. रणजीत कथावटे तसेच

• पान 10 वर

# PTV (ICSE) shines at the 46th Annual Tilak Trophy



U16 Girls' Football Team



U17 Girls' Football Team

PTVA proudly hosted the 46th Tilak Trophy (2025–26) in November, featuring an incredible participation of 105 teams competing across games such as Kabaddi, Kho-Kho, Volleyball, Football, etc.

PTV (ICSE)'s U17 Girls Football Team achieved a remarkable Runner-Up position in the prestigious tournament. Team: Madhura Patankar (Std. IX A), Prisha Galvankar (Std. X B), Ira Sane (Std. IX B), Prachi Phanse (Std. IX C), Spruha Bapat (Std. IX C), Shruti Gokhale (Std. IX B), Swara Poman (Std. IX B), Swara Kamerkar (Std. VIII B), Kavya Mahadik (Std. VIII B), Prisha Salunkhe (Std. VII A), Kshitija Barge (Std. VII A), Vedangi Bhatt (Std. VII B).

Also, the U16 Girls' Football Team of the school secured the Runners-Up Trophy in the Tilak Trophy 2025-26 held on November 15 and 16. Team: Sarika Deshmukh, Captain (Std. X B), Sanaya Bhave, Goalkeeper (Std. IX B), Urvi Patil (Std. IX C), Aahana Bhalla (Std. IX C), Srushti Khidbide (Std. X B), Mahek Nandu (Std. IX C), Nyssa Dhardwadkar (Std. IX A), Drishya Satra (Std. IX C), Sanavi Shirke (Std. VIII C), Anesha Kshirsagar (Std. X C).

## Proud recipient of India School Merit Award and Mimamsa Award is....





PTV (ICSE) has been ranked No. 13 in India, No. 7 in Maharashtra, and No. 4 in Mumbai in the Top 20 ICSE Schools category, according to the survey conducted by Education Today. This recognition is based on 15 parameters, evaluated through a combination of jury ratings and parent votes, making it a credible and comprehensive assessment of educational excellence. PTVA's Honorary Treasurer, Shri Bansidhar Dhurandhar received the

• Pg. 10

# Young minds explore the Wonders of Science



World Science Day was celebrated at PTVEMS (Primary) with great excitement and curiosity. The programme began with a brief introduction, during which the students were explained what science is and how it is present all around us in our daily lives. They also learnt about who started World Science Day and the purpose behind celebrating it.

The children also enjoyed an informative performance by Grade 4 students, who presented a creative dance depicting the life cycle of a butterfly. Following the performance, the teacher demonstrated four fascinating science experiments: a colourful lava lamp, the refraction of light, the buzzing sound produced by a nut in a balloon, and the difference in density between saltwater and normal water.

The programme concluded with an exciting quiz to assess how much our young, budding scientists had learnt.



# Fallen Leaves turn into Artful Wonders

PTV ICSE (Primary) conducted a Leaf Art Collage Activity for Grade 3 students on December 2 to celebrate the beauty of autumn. Students collected fallen leaves of different hues, sizes and shapes and used them to make creative collages and leaf animals. The activity encouraged creativity, outdoor exploration, and appreciation of nature.




# Choose Health, Choose No Sugar...

To promote healthy eating habits and raise awareness about the ill effects of excessive sugar consumption among students, PTVA's EMS, Andheri initiated a campaign - 'Choose Health, Choose No Sugar...', the occasion was the 'World Diabetes Day' which is observed on November 14 (Sir Frederick Banting's birthday),

The campaign included various activities which aimed to encourage students to reduce their sugar intake. In a special assembly programme, teacher Mrs Manasi Sharma shared tips on reducing the risk of diabetes through lifestyle changes.

Students of Std. V displayed sample alternatives for sugar such as dates, jaggery, honey, stevia powder, etc. and exhibited mouth-watering delicacies like Modaks, Kheer, Chikki, Kurmura-Peanut Laddoos, Gul-Papadi, Anarase, etc. which were prepared using the sugar alternatives.

A Sugar Board displayed informative charts which highlighted the amount of sugar consumed through processed, packaged food and drinks.

Students of Std. IV and Std VI took a pledge to Eat Less Sugar and make a healthier choice.

With the students of Std. V to IX, School Counsellor Mrs Suchira More discussed the health hazards led by excessive sugar consumption and emphasised on the benefits of a balanced diet and exercise through her PowerPoint presentation.

Through this campaign, the school took a step towards promoting right eating habits a healthier lifestyle among the students.

# Building Better Communicators



The Interact Club of PTVEMS (Secondary) organised a lecture on Effective Communication by Mr Vedant Bajaria, an experienced communicator and youth mentor. The programme began with a warm introduction by Asmi Shetiya, President of the Interact Club.

Through interactive activities, Mr Bajaria explained that effective communication means conveying one's message clearly, confidently and respectfully. He stressed the use of appropriate words, 'I' statements and the influence of tone—pitch, pace and volume—on how a message is received.

Students also learnt the value of active listening, empathy and positive body language such as eye contact, posture and facial expressions. He guided them on managing emotions, understanding assertiveness versus aggression and resolving conflicts through compromise. Tips on digital communication and proper online etiquette were also shared.

An enthusiastic question–answer session brought the programme to a close, making the lecture informative and impactful for all attendees.

# Blind Encounter with a Book




This November, the Book Club members of PTV (ICSE) hosted a fun and mysterious activity — "Blind Encounter with a Book!"

Students brought books they loved, wrote 3–5 intriguing clues about each story, and wrapped them creatively — some in brown paper, some in colourful sheets, newspapers, or plain white paper — with hints like "A mystery read awaits!" or "Guess before you unwrap!"

During the session, participants chose books purely based on the clues and tried to guess the stories inside. The activity sparked curiosity, excitement, and friendly discussions as children shared their guesses and explored new literary possibilities.

A delightful start to the monthly book club, reminding everyone that sometimes the best stories are discovered in the most unexpected ways!



# Lights, Camera, Action

To hear the full talk show on YouTube, kindly scan the QR code.

To celebrate World Television Day, PTV (ICSE) students of Grade 7 and 8: Anushri Joshi, Arya Khatkhate, Mrunmayee Phake, Avanti Abhyankar, and Rutva Nadkarni, came together to create something truly special.

Showing remarkable initiative and teamwork, the students conceptualised and produced their very own TV talk show. They didn't just act in it; they wrote the script, directed the scenes, handled the camera work, edited the footage, and brought in all the authentic on-screen mannerisms that make a talk show come alive.

Their enthusiasm and creativity transformed the classroom into a buzzing studio full of energy and innovation.

# A Comparison: International Students and Indian Students

Education around the world is shaped by culture, values, and societal needs. Comparing international students with Indian students reveals two distinct yet complementary approaches to learning.

International schools tend to be highly student-centric, with classrooms that focus on discussions, projects, and independent research. Assessments are usually continuous, relying on assignments, presentations, and portfolios. Students are encouraged to question, explore, and think creatively.



Indian students, on the other hand, grow within a system known for strong academic foundations, especially in Mathematics and Science. Discipline, rigour, and memorisation are key strengths. However, many Indian schools are increasingly adopting activity-based and experiential learning. Together, these systems nurture confidence, practical thinking, strong fundamentals, and consistency—qualities essential for both imagination and execution.

Mental-health support also differs. International schools typically have established counselling systems and open conversations about stress or learning difficulties. Indian schools and families are rapidly increasing awareness, with many institutions now appointing counsellors. Traditionally, Indian children also benefit from emotional safety within close-knit family structures. Thus, one environment offers structured support, while the other provides deep familial care.

Family backgrounds further shape experiences. International students often promote early independence and decision-making. Indian parents remain highly involved, guiding academics, health, and career choices with dedication. These approaches together cultivate both independence and connection.

Food habits differ as well—international students follow structured meal routines and explore varied cuisines, while Indian students enjoy diverse home-cooked meals rich in nutrition and tradition.

Extra-curricular exposure is strong in both systems. International schools integrate sports, arts, and technology into schooling, while Indian students pursue talents through school programs and external coaching. Both models ultimately support holistic growth.

**Final Thought**

*Both systems resemble two different gardens:*

*One spreads wide with open skies and exploratory paths;*

*The other grows deep with strong roots and rich soil.*

When students take the best of both—curiosity and discipline, independence and family warmth—they become truly global learners, ready to thrive anywhere in the world

**-Ms Meghna Barve,**
**School Counsellor,**
**PTVEMS(Primary)**

# Discovering the joy of Maths

Mathematics is not just for scientists or engineers—it is for everyone. It sharpens our mind, empowers our decisions and reveals the beauty of the universe. From the time we wake up to the time we go to bed, we all use maths without even realising it. But many children fear maths due to pressure and difficulty. Another reason students may struggle with maths is the lack of basic concepts.

Here are some simple yet very important tips and techniques which will surely make maths interesting and help students connect maths with real-life situations.



**1. Understand the Concepts**

Unless you know how the formulas are derived, what you have learnt will not stay with you. Don't just memorise the formula, rather understand how it is derived.

**2. Practise Regularly**

Maths is a skill like playing an instrument or learning a language. Its regular practice converts understanding into mastery.

**3. Break Down Problems into Parts**

Complicated questions can make you nervous. But when you break them down into smaller parts it reduces the amount of frustration.

**4. Learn from Mistakes**

When you've answered something wrong, don't just erase it but take a moment to figure out where you went wrong. Mistakes are some of your best learning tools.

**5. Use Real-Life Examples**

When you apply maths to real-life situations the concepts become more concrete and less abstract. For example, if you need help understanding percentages try calculating discounts on your shopping.

**6. Master the Basics**

Before taking on large topics, it is important to have a better understanding of basic arithmetic. For example, addition, subtraction, multiplication and division.

**7. Use Visual Aids and Tools**

Maths isn't always something done in your mind. Visualising problems can help explain them particularly with geometry fractions and statistics. For example, use pie charts, bar graphs and diagrams.

**8. Ask Questions**

Ask questions and clarify doubts when they come up no matter how small or silly they may seem to you.

**9. Make Maths Fun**

Creating a playful experience in maths is a great way to develop your problem-solving skills. For example, Sudoku, Sumoku, KenKen, Prime Clive and the 24 Game.

**10. Stay Positive**

Finally, mind-set is important. If you think you're 'bad at maths,' that is going to block your progress even before you start. Instead, think of maths as a skill that can be developed with effort and time. Parents can help by making learning playful through games and daily-life examples, praising efforts over results, reinforcing basics and understanding individual learning styles. Let us stop seeing maths as a barrier and start embracing it as a bridge to knowledge innovation and a brighter future.

**- Mr Rajendra Sanga,**
**Teacher, PTVEMS (Secondary)**

# World Science Day for Peace and Development

Every year on November 10, we celebrate World Science Day for Peace and Development, a reminder that science is not just about discoveries, it is about using knowledge to build a peaceful and sustainable world.

As a science teacher, I see science as more than equations and experiments. It is a way of thinking that helps us solve real-world problems like climate change, pollution, and resource depletion. Science empowers us to ask questions, find evidence, and make informed choices that shape a better future.



Recent advances show how science drives sustainability. Scientists are developing blue carbon projects that restore mangroves and seagrasses to capture carbon and protect coastlines. Solar and wind energy innovations are helping countries reduce dependence on fossil fuels. Research on recycling electronic waste is turning discarded gadgets into useful materials. Even satellite monitoring of glaciers and forests guides conservation and sustainable water use.

In schools, we can nurture this spirit by encouraging students to link scientific knowledge with everyday action: reducing waste, conserving energy, or innovating with recycled materials. When students see that their experiments connect to global goals, they realize that science is a tool for peace, equity, and progress.

This World Science Day, let us remind our students that every scientific inquiry, no matter how small, can contribute to a sustainable and peaceful planet. Science gives us hope, direction, and the power to create lasting change.

**- Ms Joshmi Johnson,**
**Assistant Teacher, PTV (ICSE)**



# Let's Pledge for a Healthier Future

On the occasion of World Diabetes Day, the students of PTV (ICSE) came together to raise awareness about the importance of healthy living and diabetes prevention. As part of the celebration, a vibrant Pledge Wall was set up where students enthusiastically shared their personal commitments to better health.

From promises to eat more fruits and vegetables, exercise regularly, and cut down on sugary drinks, to pledges to encourage friends and family to lead active lifestyles — each note reflected a sincere desire to make positive change.

The activity not only highlighted the importance of making mindful choices but also reminded everyone that small, consistent habits can make a big difference in preventing diabetes and promoting overall well-being.

# The Evolution of Indian Education

The Gurukul system emphasised holistic learning, character building, joyful learning and close teacher–student bonding. NEP 2020 echoes these ideals through experiential learning, value-based education and personalised mentorship. Both approaches aim to nurture independent thinking, essential life skills and a harmonious relationship with society and the environment.



Mrs Kavita Kapoor, Teacher at PTVEMS (Secondary), delivered an award-winning elocution speech—first at the Ward level and second at the District level in the Sahashaleya Elocution Competition 2025—exploring the key features and methods of India's ancient Gurukul system and drawing insightful parallels with NEP 2020 to show how modern education revives these timeless ideals.

National Education Day is celebrated to honour the birth anniversary of Maulana Abul Kalam Azad, India's first Education Minister, whose vision laid the foundation for modern education in the country. On this occasion, we are proud to share our teacher's views.

To hear the full speech on YouTube, kindly scan the QR code.





# It's Picnic Time!

November brought great excitement as picnic was organised for students of Std. V to X of PTVEMS. The day began with cheerful faces and eager anticipation as students set off for a fun-filled outing. Laughter, friendly conversations, and engaging activities made the day lively and memorable. The picnic offered a refreshing break from routine and strengthened the bond between students and teachers. With careful supervision, smooth transport arrangements and timely meals, the teachers ensured a safe and enjoyable experience for all. The students returned with joyful memories and renewed enthusiasm.




# Bringing Animal Kingdom to Life

The Grade 7 students of PTV (ICSE) presented their Biology Culmination on "Classification of Animals." Through charts, role plays, quizzes, and demonstrations, students showcased their understanding of how animals were grouped based on their body structure, characteristics, and habitats.

The event highlighted the rich diversity of the animal kingdom and helped learners appreciate how classification made the study of living organisms clearer and more meaningful.

The students showcased their curiosity, creativity, and hard work put into bringing this topic to life.



# Say Yes to Life No to Addiction

A seminar on Nasha Mukt Bharat was organised for Std. IX students of PTVEMS on November 12 by the Brahma Kumaris as part of the GOI's Nasha Mukti initiative. The dignitaries stressed the importance of good habits and highlighted the harmful effects of addiction. They explained discipline, punctuality and achieving inner peace through daily yoga practice.

The session was interactive, with questions about students' daily routines that made it engaging and child-friendly. Students listened attentively to the concepts and illustrations shared. At the end, inspirational quote cards were distributed to encourage positive thinking and support students' physical, mental and emotional well-being.





# Brushstrokes of Care

To mark Infant Protection Day, Primary Section Art Teacher of PTV (ICSE), Mrs Geetanjali Mahalle, created a meaningful and visually impactful drawing to spread awareness about the importance of protecting and nurturing infants.

Her artwork beautifully conveys the message of care, safety and responsibility towards the youngest members of society. The thoughtful illustration helped students understand the value of providing a secure and loving environment for infants.



# 'POWERING' TOMORROW!

'Energy Conservation Week' was celebrated at PTVA'S EMS, Andheri from December 1 to 6 with great enthusiasm to promote awareness about the importance of saving energy and protecting the environment. Throughout the week, students engaged in a variety of meaningful activities designed to foster practical understanding and responsible habits.




An energy audit conducted by the 'Green Guardians' of Grade 5 helped them identify areas of energy use within the school and encouraged them to think of realistic conservation measures. A poster-making competition for Grade 6 allowed students to creatively express messages on sustainable energy use, while a powerful 'Nukkad Natak' by the students of Grade 7 conveyed the consequences of energy wastage in an engaging manner. The quiz competition organised for Grade 9 further strengthened students' knowledge about renewable resources, energy efficiency, and environmental conservation. The celebration concluded with everyone taking an 'Energy Conservation Pledge' prepared by Grade 8, reaffirming their commitment to adopting eco-friendly practices at school and at home.

The week proved to be an enlightening experience, inspiring students to become responsible and aware citizens of a greener future.

**-Mrs Aarti Kalekar,**
**Asst. Teacher, PTVA's EMS, Andheri**

# A Word Feared By Most

Cancer - a word that strikes fear in the hearts of many. It is not just an illness; but an emotional storm that shakes families, disrupts lives, and tests the human spirit. The journey of a cancer patient is often marked by painful treatments, physical weakness, emotional exhaustion, and immense uncertainty. It affects not only the body but also the mind, relationships, and the daily rhythm of life. Watching a loved one lose their strength or their energy is a heart-wrenching experience that no family forgets.



Yet, even in this darkness, medical science has made tremendous progress. Today, doctors are equipped with advanced tools, targeted therapy, immunotherapy, improved chemotherapy, early-detection screenings, and minimally invasive surgeries. These breakthroughs have helped millions live longer, better, and with renewed hope. Many forms of cancer that were once considered untreatable are now manageable, and some even curable when caught early. Research continues every single day, pushing boundaries and offering new chances for survival.

Still, prevention remains our most powerful shield. While we cannot control our genetics, we can control several lifestyle choices that significantly reduce risk. Avoiding tobacco, protecting skin from harsh sun, choosing wholesome and fresh food, staying physically active, maintaining a healthy weight, limiting alcohol, getting recommended vaccines like HPV and Hepatitis B, and going for regular health check-ups all play a crucial role. Early detection through routine screenings can turn a life-threatening diagnosis into a treatable condition.

Cancer may be dreadful, but knowledge, awareness, and proactive care give us strength. By making mindful choices today, we safeguard not just our own future, but also the well-being of the people we love.

**- Ms Priyanka Jagwani,**
**Assistant Teacher,**
**PTV ICSE (Primary)**





# Joyful Journeys

PTVEMS (Primary) recently organised an exciting and memorable picnics for its students.

For Std. 3 and 4, the destination was KidZania, where students experienced real-life activities through engaging workshops such as diya painting, donut making, dental care training, and construction activities. The children explored different roles, learning new skills while having immense fun. The highlight of the day was the Snow Kingdom, where the students gleefully played, slid, and enjoyed the chilly adventure.

Meanwhile, the much-awaited picnic for Std. 1 and 2 took them to the vibrant world of Tic Tac Tot. The day began at 6:30 AM with cheerful excitement, and the journey to the destination was filled with songs, chatter, and laughter. At Tic Tac Tot, the students enjoyed rides, games, and activities, their faces lighting up with delight. After a delicious lunch, they visited the Bird Sanctuary and Fish Paradise, observing colourful birds and shimmering fish with curiosity and wonder. The return journey was lively with songs and jokes, leaving students tired but happy.

# Expressing the Power of Kindness

PTV ICSE (Primary) celebrated World Kindness Day on November 13 by organising a Story Writing Activity for Grade 4. The theme for the event was "Kindness is the solution to a problem," encouraging students to think about how simple acts of kindness can make a big difference.

Students wrote original stories in class, expressing thoughtful ideas and creative situations where kindness helped solve everyday problems. Their narratives showed how helping a friend, caring for someone in need, or supporting others can bring happiness.



The activity not only enhanced their writing skills but also helped them understand the value of empathy and compassion. It was a meaningful reminder that even a small act of kindness can create a positive change.



# D.E.A.R time!

The PTV (ICSE) Primary Section conducted the D.E.A.R (drop everything and read) activity on November 20. All students and staff participated by pausing their routine work and engaging in dedicated reading time. The activity aimed to build regular reading habits and create a joyful, literacy-rich environment across the school.

# अमरावतीचा प्रवास आणि नाटकाचा ध्यास

दिवाळीची सुटी सुरू झाली आणि आमच्या जिल्हास्तरीय नाटकाच्या प्रयोगाची सूचना मिळाली. दुसऱ्याच दिवशी नेहरू सायन्स सेंटरमध्ये प्रयोग होता, म्हणून आदल्या दिवशी दिवसभर आम्ही शाळेच्या हॉलमध्ये सराव करत होतो. प्रत्येक सरावात काहीतरी सुधारणा—उच्चार, वाक्य, गाणे—अवश्य होत असे. मी शाळेत असताना लिहायला सुरुवात केली, पण स्वतःपुरते लिहिणे आणि रंगमंचावर सादरीकरण यात खूप फरक असतो. प्रेक्षक हा नाटकाचा खरा न्यायाधीश. आपल्या लेखनाचा दिग्दर्शक हृषिकेश देशाई—आमचा माजी विद्यार्थी—त्याचं संगीत आणि नाटकावरचं विलक्षण वेड जाणवत होतं.

या वर्षी आमचे नाटक होतं भारताच्या पहिल्या महिला वैज्ञानिक डॉ. कमला भागवत यांच्यावर. मीनल यांच्या प्रेरणेने मी त्यांच्यावर संशोधन सुरू केले. ध्रुवा संपताच जोरदार कामाला लागले कारण नाटक फक्त दोन दिवसांवर आले होते. दोन दिवस शाळेतच रात्रंदिवस सराव करून प्रसंग बसवले आणि वॉर्ड, झोनल, जिल्हा तिन्ही स्तरांवर प्रथम क्रमांक मिळाला. नंतर राज्यस्तरीय अमरावतीसाठी निवड झाल्यावर खरी धडपड सुरू झाली.

पालकांची ऑनलाइन बैठक घेऊन संमती घेतली. ट्रेनचे आरक्षण मिळत नव्हते, सेट कसा न्यायचा हा प्रश्न मोठा. तेव्हा आमचे फडके सर देवासारखे धावून आले—खर्च, सोय, फॉर्म, सगळ्यांचा तपशील त्यांच्याकडे तयारच होता. दिवाळीच्या दिवशीही त्यांनी व हृषिकेशने फॉर्म चर्नी रोडला नेऊन दिले. बसची सोय न मिळाल्याने भक्ती देसाईच्या मदतीने दामले सरांची नाटक कंपनीची बस मिळाली.

मुख्याध्यापिका स्मिता बिवलकर सतत मार्गदर्शन करत होत्या. आमचे बालकलाकार—आश्नी कदम (कमला), पार्थ फडके (सी. व्ही. रामन), ओम बेंद्रे (श्रीनिवसय्या), पूर्वा साळुंखे (शिक्षिका), आणि विज्ञान मंडळातील निधी, आदित्य, शर्वरी—सगळेच जोमाने काम करत होते. लाईव्ह संगीतासाठी धवल, मिष्टी, स्वरा, दीक्षा, आणि तबला-पखवाजासाठी श्रेयान व दिव्यम होते. प्रॉप्ससाठी यामिनी व दीक्षाने अक्षरशः जादू केली.





निघायच्या आधी रात्री दीक्षा कमला ताईचा पोशाख शिवत होती. पहाटे ३.३० ला बस पकडून प्रवास सुरू झाला. समृद्धी महामार्गावर दोन टायरमधला पाईप तुटल्यामुळे आम्ही अडकलो. मुलांना काळजी लागू नये म्हणून मी त्यांना धावायला, खेळायला लावलं. मेकॅनिक आला तोही दुसऱ्या वाहनासाठी आला असताना आमच्यासाठी आवश्यक पार्ट घेऊन—हे खरंच देवाचं देणं होतं. दोन तासांनी प्रवास पुन्हा सुरू झाला आणि रात्री ९.३० ला अमरावतीत पोहोचलो.

रात्री एक वाजेपर्यंत सराव करून सर्वजण झोपले. सकाळी काकड आरतीला गेल्यावर मनाला दिव्य शांतता मिळाली. नाटकाच्या पहिल्या गाण्याच्या दोन ओळी न सुचल्याने काळजी होती, पण सभागृहात जातानाच उपाय सुचला.

नाटक सहाव्या क्रमांकावर होतं. सेट लावण्यासाठी १० मिनिटे—आम्ही सातव्या मिनिटाला तयार. नाटक रंगत गेलं, कमला रंगमंचावर कोसळली तेव्हा आमचेही डोळे पाणावले. अंतिम गाणं साडेएकोणतीस मिनिटांनी संपले—वेळ मर्यादित!

निकाल आला—सर्वोत्कृष्ट नाटक द्वितीय, सर्वोत्तम पटकथा प्रथम, आणि 'कमला' आश्नीची परीक्षकांकडून विशेष निवड. आनंदात परतीचा प्रवास झाला.

अमरावतीची ती सफर मनात कायमची घर करून राहिली... नाटक हे खरोखर व्यसन—एक वेड, एक ध्यास!

**- Dr Vidnyapana Gokarnakar,**
**Teacher, PTVEMS (Secondary)**

# एकपात्री अभिनयातून वासुदेव बळवंत फडके यांच्या कार्याचे प्रेरणादायी दर्शन

पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक मराठी शाळेत ४ नोव्हेंबर रोजी आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि वासुदेव बळवंत फडके यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती. अंजली प्रभूकेळुस्कर यांनी वासुदेव बळवंत फडके यांच्या जीवनकार्याचा आणि ब्रिटिशांविरुद्धच्या त्यांच्या पहिल्या सशस्त्र लढ्याचा परिचय विद्यार्थ्यांना करून दिला.

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे चौथीच्या वर्गातील तावी विक्रम गायकवाड या विद्यार्थिनीने वासुदेव बळवंत फडके यांच्या जीवनावरील एकपात्री अभिनय (Mono-acting) सादर केला. या अभिनयात फडके यांनी घेतलेली शपथ, त्यांचा संघर्ष आणि देशासाठी त्यांनी पत्करलेला त्याग, याचे प्रभावी चित्रण






करण्यात आले. त्यानंतर इयत्ता तिसरीतील शंभू शिवाजी भुजबळ या विद्यार्थ्याने फडके यांच्या जीवनावर आधारित एक गोष्ट सांगितली. या कार्यक्रमातून "फडके यांचा लढा आपल्याला अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देतो. प्रत्येक विद्यार्थ्याने त्यांच्या साहसातून प्रेरणा घेऊन आपले ध्येय साधले पाहिजे," अशी शिकवण देण्यात आली.



URC- 4 द्वारा आयोजित तालुकास्तरीय स्पर्धेत पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक शाळेतील शिक्षिका मीनाक्षी महेश गोरिवले यांनी प्रवासवर्णन या स्पर्धेत तर शिक्षक गेंदप्पा सुळे यांनी कथालेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. त्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

# 'फुलांचे संमेलन' एक अभिनव उपक्रम

विद्यार्थ्यांना विविध फुलांचा परिचय व्हावा या उद्देशाने पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक मराठी शाळेतर्फे बाल दिनाचे औचित्य साधून 'फुलांचे संमेलन' या छोटेखानी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात विविध परिचित व अपरिचित फुलांचे नमुने मांडण्यात आले होते.

फुलांचे रंग, आकार, वास आणि त्यांची नावे याबद्दल मुलांना प्रत्यक्ष माहिती देण्याचा अभिनव प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाबद्दलची आवड आणि कुतूहल वाढीस लागण्यास मदत झाली. या प्रकल्पाची मूळ संकल्पना शाळेच्या मुख्याध्यापिका अंजली प्रभूकेळुस्कर



बाईंची होती, ज्यातून विद्यार्थ्यांना फुलांचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला.

बाईंच्या संकल्पनेतून आलेल्या या उपक्रमात शाळेच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या प्रदर्शनात सक्रिय सहभाग घेतला आणि फुलांच्या मांडणीत मोलाचे योगदान दिले. यामुळे उपक्रमाला एक आगळेच स्वरूप प्राप्त झाले.

या प्रदर्शनाला पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनतर्फे श्री. दांडेकर सर, समन्वयक जान्हवी खांडेकर तसेच माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती. मिठे व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शाळेचे विद्यार्थी व पालक यांनी मोठ्या संख्येने प्रदर्शनास भेट दिली आणि विविध फुलांची माहिती उत्सुकतेने जाणून घेतली. हा उपक्रम ज्ञानवर्धक व मनोरंजक ठरल्याचे मत पालकांनी व्यक्त केले. एकूणच, पार्ले टिळक विद्यालयाचा 'फुलांचे संमेलन' हा उपक्रम बालकांच्या सर्जनशीलतेला आणि ज्ञानार्जनाला चालना देणारा ठरला, ज्यामुळे शाळेचे शैक्षणिक उपक्रम अधिक समृद्ध झाले.



दरवर्षी ७ नोव्हेंबर हा 'राष्ट्रीय कॅन्सर दिन' म्हणून साजरा केला जातो. त्याचे औचित्य साधून पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक शाळेने इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी जंक फूड व मोबाईलचे आपल्यावर होणारे दुष्परिणाम याविषयी कार्यशाळा घेतली. यात श्रीमती. प्रिया शानभाग व श्रीमती. माधुरी सावंत यांनी मुलांना मार्गदर्शन केले.

**पान १ वरील श्लोकाचा अर्थ :**

**हे नवीन वर्ष तुम्हाला आयुष्य, कीर्ती, धन, विद्या आणि यश या सर्वांचे वरदान देवो.**

# शिक्षकांचा निवृत्ती समारंभ



ललिता माने



उमा दळवी



वसुधा कारंडे

पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यम माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका श्रीमती.उमा अशोक दळवी या नियत वयोमानानुसार ३१ ऑक्टोबर रोजी, उपमुख्याध्यापिका श्रीमती. ललिता किरण माने ४ नोव्हेंबर रोजी तर शिक्षिका श्रीमती. वसुधा उत्तम कारंडे या ३० नोव्हेंबर रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या.

बीए, बीएड व डीएसएम ही शैक्षणिक अर्हता असलेल्या उपमुख्याध्यापिका ललिता माने या मराठी व सामाजिक अभ्यास या विषयांचे अध्यापन करत असत. विद्यालयातील मराठी दालन व भूगोल दालनाच्या निर्मितीमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता. इतिहास आणि भूगोल या विषयांची त्यांना विशेष आवड आहे. वेगवेगळे चविष्ट पदार्थ बनवणे, बागकाम, शेतीकाम, वाचन, भरतकाम व पर्यटन या गोष्टींमध्ये त्यांना रुची आहे. ३२ वर्ष चार महिने एवढा प्रदीर्घ कार्यकाळ त्यांना लाभला. ४ नोव्हेंबर रोजी श्रीमती. माने यांचा निवृत्ती समारंभ विद्यालयात संपन्न झाला.

तर पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यम माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका श्रीमती.उमा अशोक दळवी या नियत वयोमानानुसार ३१ ऑक्टोबर रोजी सेवानिवृत्त झाल्या. त्यांचाही निरोप समारंभ ४ नोव्हेंबर रोजी विद्यालयात आयोजित करण्यात आला होता. एम. एस. सी, बी. एड व डी .एस. एम ही शैक्षणिक अर्हता असलेल्या श्रीमती.दळवी यांनी मराठी विज्ञान परिषदेसाठी भरीव कार्य केले आहे. त्या कोकणातील विद्यार्थ्यांना देखील मार्गदर्शन करत असत. गणित, विज्ञान ,भूगोल हे विषय प्रयोगातून समजावण्याच्या कामी त्यांचा सक्रिय सहभाग होता. इंटेलतर्फे संगणकाचे प्रशिक्षण त्यांनी घेतले व हे प्रशिक्षण देऊन विद्यालयातील शिक्षकांनाही प्रशिक्षित केले. वाचन, योगा, समाजकार्य, गाणी ऐकणे, निसर्गाच्या सानिध्यात राहणे, ट्रेकिंग करणे हे बाईंचे छंद आहेत. बाईंचा कार्यकाल ३२ वर्ष ४ महिने इतका आहे.

तसेच पार्ले टिळक विद्यालय माध्यमिक विभाग मराठी माध्यमातून शिक्षिका वसुधा उत्तम कारंडे या ३० नोव्हेंबर रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या. २००६ मध्ये पार्ले टिळक विद्यालयात अतिरिक्त शिक्षिका म्हणून त्यांचे समायोजन झाले होते. परंतु अल्पावधीतच त्या विद्यालयामध्ये छान रुळल्या. मुलांमध्ये लोकप्रिय शिक्षिका ठरल्या. शिक्षक चळवळीशी देखील त्या संलग्न होत्या. दोन वेळेला सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले होते. शिक्षकभारती या संघटनेच्या त्या कार्यकारी सभासद होत्या. वाचन, लेखन, गायन, प्रवास करणे याची आवड असलेल्या बाई आदिवासी पाड्यांमध्ये आर्थिक आणि सामाजिक मदत करण्यामध्ये सुद्धा अग्रेसर आहेत. बाईंचा समाज संपर्क दांडगा आहे. लोकांना संघटित करण्याची हातोटी त्यांच्याकडे आहे.

निवृत्त सर्व शिक्षकांचे पुढील आयुष्य निरोगी आणि आणि समाधानी जावो हीच विद्यालयातर्फे शुभेच्छा.

# एनसीसी दिवस उत्साहात साजरा



पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यम माध्यमिक विभागात २० नोव्हेंबर रोजी एनसीसी दिवस मोठ्या उत्साहात आणि शिस्तीत साजरा करण्यात आला.

एनसीसीच्या मुलामुलींनी एकत्रित भरपूर मेहनत करून हा कार्यक्रम सादर झाला. 'कंधो से मिलते है कंधे' या गाण्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सैनिकांच्या अखंड निश्चयाचं, एकदिलाने मिळून चालण्याचं आणि राष्ट्राच्या रक्षणासाठी कोणतीही किंमत देण्याच्या तयारीचे प्रेरणादायी स्वरूप या गीतातून मांडले गेले. यानंतर भारताचा तिरंगा, जो शौर्य, शांतता आणि प्रगती यांचे प्रतीक आहे त्या तिरंग्याला वंदन करण्यात आले.

ऑपरेशन सिंदूर आपणा सर्वांसाठीच एक मानबिंदू ठरले. हे ऑपरेशन कसे झाले हे एनसीसीच्या मुलांनी सादरीकरणातून फारच प्रभावीरित्या सादर केले. सैनिकांचे आयुष्य, प्रशिक्षणातील कठोरता, सीमेवरील धैर्य, आणीबाणीच्या परिस्थितीतही देशाचे संरक्षण करण्याची तयारी हे सर्व सुद्धा या नृत्यातून दाखवले गेले. या नृत्याने सर्वच उपस्थितांच्या मनाला स्पर्श केला.

यानंतर सेमा फोर या अतिशय रोचक आणि महत्त्वाच्या नेवल कम्युनिकेशन पद्धतीची माहिती प्रत्यक्ष सादरीकरणातून एनसीसीच्या मुलांनी करून दिली. सेमा फोर फ्लॅग सिग्नलिंग ही एक महत्त्वाची नेव्हल कम्युनिकेशन पद्धत आहे. एकोणिसाव्या शतकात समुद्री संवादासाठी मोठ्या प्रमाणावर ही पद्धत वापरली जात होती. आधुनिक काळातही आपत्कालीन किंवा इंटरनेट नसलेल्या परिस्थितीत ही पद्धत आजही उपयोगी पडते. हातातील दोन झेंड्यांचा वापर करून संदेश पाठवण्याची ही पारंपरिक पद्धत आहे. यात प्रत्येक अक्षरासाठी हाताची व हातातील झेंड्यांची विशिष्ट स्थिती असते. एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी या विविध स्थिती दर्शवून उपस्थितांची दाद मिळवली.

यानंतर एनसीसी रायफल डेमो देण्यात आला. रायफल योग्य पद्धतीने उचलणे, धरून ठेवणे, चालवणे, रायफलची योग्य पकड, संतुलन या गोष्टी अतिशय महत्त्वाच्या असतात. हे सर्व करत असतानाच तालबद्ध रीतीने प्रमुख पाहुणे आणि तिरंग्याला मानवंदना देण्यात आली. एकाच आदेशावर समान हालचाली करणारे एनसीसीचे विद्यार्थी हे टीम वर्क, अनुशासन आणि समर्पण याचे उदाहरणच होते. या रायफल डेमोनेही उपस्थितांकडून दाद मिळवली.

लाठीकाठी हा फक्त खेळ नाही तर ती स्वसंरक्षणाची कला आहे. शौर्याची परंपरा आणि अनुशासनाचे प्रतीक आहे. पूर्वीच्या काळी आपल्या गावाचे, कुटुंबाचे आणि स्वतःचे रक्षण लाठीकाठीचा वापर करून करत असत. आपल्या एनसीसी कॅडेट्सने हेच परंपरागत शस्त्र हाती घेऊन, संतुलन व हाताचे नियंत्रण यांचा अप्रतिम संगम दाखवला. लाठी फिरवताना त्यांच्या हाताचा वेग, निर्माण होणारी तालबद्ध लय हे सगळं पाहताना आपल्या मराठमोळ्या परंपरेचा सर्वांनाच अभिमान आणि एनसीसी कॅडेट्सचे कौतुकही वाटले.

यानंतर अप्रतिम असे एनसीसी गीत सादर झाले. उपस्थित असलेले विद्यार्थी व शिक्षकांनी देखील स्वयंस्फूर्तीने या गीतात स्वतःचा सूर मिसळला.

शाळेच्या मुख्याध्यापिका मुक्ता मिठे यांनी सर्व एनसीसी कॅडेट्सचे कौतुक केले. मुख्याध्यापकांनी दिलेली ही कौतुकाची थाप खूप महत्त्वाची आणि एनसीसीच्या मुलांना प्रोत्साहन देणारी होती. या सर्व कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे कार्यक्रमाचे प्रमुख श्री. शिंदे सर हे काही कारणाने सरावाच्या वेळी उपस्थित राहू शकत नव्हते पण विद्यार्थ्यांनी स्वतःच स्वयंस्फूर्तीने हा सराव केला. फक्त सरावच नाही तर संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन, सूत्रसंचालन आणि अत्यंत शिस्तबद्ध आखणी सुद्धा विद्यार्थ्यांनीच केली होती.

एनसीसी दिनाचा हा कार्यक्रम पाहणारे इयत्ता सहावी आणि सातवीचे विद्यार्थी भविष्यामध्ये एनसीसीकडे नक्की वळतील असा आम्हाला विश्वास वाटतो.




# दुर्मिळ पक्ष्यांचे छायाचित्र प्रदर्शन

'बर्डमॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळख असलेल्या डॉ. सलीम अली यांच्या जयंतीनिमित्त १२ नोव्हेंबर रोजी पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक मराठी शाळेत दुर्मिळ पक्ष्यांचे छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाद्वारे शाळेने डॉ. अली यांच्या कार्याला अनोखे अभिवादन केले.

शाळेच्या सभागृहात आयोजित या प्रदर्शनात, महाराष्ट्राच्या विविध भागांतील पक्ष्यांच्या प्रजातींची सचित्र माहिती प्रदर्शित करण्यात आली होती.

प्रदर्शनाच्या माध्यमातून पक्षी निरीक्षण कसे करावे याचे प्रात्यक्षिक दिले गेले.

शाळेच्या मुख्याध्यापिका अंजली प्रभूकेळुस्कर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना "आजच्या काळात वाढत्या प्रदूषणामुळे आणि जंगलतोडीमुळे पक्ष्यांचे जीवन धोक्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी जागरूक राहून, आपल्या परिसरात चिमण्यांसाठी पाण्याची सोय करणे किंवा झाडे लावणे यांसारखे छोटे उपक्रम राबवावेत," असा संदेश दिला.

शिक्षक आणि पालक यांनी प्रदर्शनाच्या यशस्वीतेबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच भविष्यातही असे पर्यावरणपूरक उपक्रम आयोजित करावेत अशी विनंती पालकांनी शिक्षकांकडे केली.

# बिरसा मुंडा जयंती साजरी

पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यम माध्यमिक विभागात १५ नोव्हेंबर रोजी भगवान बिरसा मुंडा जनशताब्दी वर्ष निमित्ताने जनजाती गौरव दिवस आणि बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती साजरी करण्यात आली.

**जननायक वीर बिरसा मुंडा**
**जिसने लहराया आजादी का झंडा...**
**भगवान बिरसा मुंडा के कार्य महान...**
**उनको हमारा कोटी कोटी प्रणाम**

जंगल, जल आणि जमिनीच्या रक्षणार्थ व भारतभूमीच्या स्वातंत्र्यासाठी अनमोल योगदान दिलेल्या भगवान बिरसा मुंडा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यम, माध्यमिक विभागात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. ब्रिटिशांनी केलेल्या अत्याचाराविरुद्ध केवळ २८ वर्ष इतक्या कमी जीवन प्रवासात आदिवासी जाती- जमातींचे आणि पर्यायाने आपल्या देशाचे रक्षण करणाऱ्या, सृष्टीचे पिता अशी उपाधी लाभलेल्या भगवान बिरसा मुंडा यांच्या स्मरणार्थ पंधरवडा साजरा करण्यात आला. इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी आदिवासी जीवन, त्यांचे सणसमारंभ, त्यांचे खेळ इत्यादी विविध बाबी रेखाटणारी वारली पेंटिंग्स काढली. त्यासाठी विद्यालयातील चित्रकला शिक्षक नितीन वानखेडे सर यांनी मार्गदर्शन केले.



भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्याचा परिचय ध्वनिक्षेपित कार्यक्रमाद्वारे इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी दिला. इयत्ता आठवी आणि नववीच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील आदिवासी जाती-जमाती, त्यांची वेशभूषा, आहार पद्धती, निवासस्थाने, त्यांचे खेळ, पारंपरिक सण उत्सव, ते साजरा करण्याच्या पद्धती इत्यादी मुद्द्यांवर आधारित सुरेख अशी हस्तलिखिते तयार केली. इयत्ता पाचवी आणि सहावीच्या विद्यार्थ्यांना भगवान बिरसा मुंडा यांचा जीवनपट उलगडणारा चित्रपट तसेच आदिवासी पारंपरिक लोकनृत्य दाखवण्यात आले. अशाप्रकारे इयत्ता पाचवी ते नववीचे सर्व विद्यार्थी विविध उपक्रमांमध्ये सहभागी झाले होते. वारली चित्रकला आणि हस्तलिखिते यांचे दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांसाठी प्रदर्शन मांडण्यात आले होते. या संपूर्ण कार्यक्रमाला श्रीमती. श्वेता संखे, श्रीमती. मधुमती देसाई, श्रीमती. नाईसकर, श्री. नितीन वानखेडे या शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

भगवान बिरसा मुंडा जनजाती गौरव दिवस यानिमित्ताने विविध उपक्रम आयोजित करून विद्यालयाने त्यांचा परिचय विद्यार्थ्यांना करून दिला व त्यांच्याप्रति आदरांजली व्यक्त केली.

# विद्यार्थ्यांनी अनुभवली सहलीची धमाल

पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यम माध्यमिक विभागाची सहल ७ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आली होती.

इयत्ता पाचवी ते सातवीची सहल घाटकोपर येथील किडझेनिया व स्नो वर्ल्ड येथे गेली होती. इयत्ता पाचवी ते सातवीच्या मुलांनी किडझेनिया येथे विविध व्यवसाय पाहिले. त्या व्यवसायिकांचे कपडे परिधान केले व खेळण्यामध्ये हे व्यवसाय करण्याचा आनंदही घेतला. समाजात असलेल्या विविध व्यवसायांची मुलांना तोंडओळख व्हावी हा हेतू सहलीमुळे सफल झाला. याच ठिकाणी मुलांनी नृत्याचा आनंदही घेतला. त्यांच्या आवडीच्या पदार्थांवर ताव मारल्यानंतर मुलांनी स्नो वर्ल्ड येथे बर्फात खेळण्याचा आनंद अनुभवला. गरम कपडे परिधान करून मुलांनी बर्फात खेळण्याचा मनमुराद आनंद लुटला.

तसेच इयत्ता आठवी ते दहावीची सहल मोंटेरिआ व्हिलेज येथे गेली होती. या ठिकाणी मुलांनी पाण्यात खेळण्याचा मनसोक्त आनंद घेतला. ट्रॅक्टरवरून मॉन्टेरिआ व्हिलेजची सफर केली. मोंटेरिआ व्हिलेजमध्ये छोटेसे गाव वसवले असून त्या गावांमध्ये विविध प्रकारचे व्यवसाय दाखवले आहेत. मुलांनी कुंभार काम करणे, सुतार काम करणे, चित्र काढणे याचा आनंद घेतला. स्वयंपूर्ण गाव कसे असते याची झलक मुलांना येथे बघायला मिळाली. या दोन्ही सहली सुखरूपपणे पार पडल्या. सहलीच्या आठवणी मुलांच्या मनात अनेक वर्ष राहतील यात शंका नाही.





PTV ICSE (Primary)




PTV ICSE (Secondary)



PTVA's EMS, Andheri

# PTVA Schools come alive on Children's Day

Children's Day at PTVA schools was filled with cheer, energy, and heartfelt moments.

At PTVEMS (Primary), the programme began with an exciting magic show. After this engaging start, the prize distribution ceremony for Poem Recitation Competition was held. It was followed by honouring the Abacus Champions. One of the highlights of the event was a special performance by the PTA members. They presented a beautiful and meaningful dance conveying an important message about reducing mobile usage. The teachers also came forward with a heartfelt gesture, singing a melodious song dedicated to their students and expressing love, care, and encouragement. The celebration concluded on a cheerful note when Mickey Mouse made a surprise entry. Students couldn't hold back their excitement as they danced freely and happily, making it the perfect ending to a memorable programme.




PTVEMS (Secondary)



PTVEMS (Primary)

The programme at PTVEMS (Secondary) was compered by Mrs Mrudula Phatak. It began with a tribute to Pandit Jawaharlal Nehru, garlanded by Headmistress. Teacher Mrs Aditi Agashe addressed the gathering, inspiring students to embrace qualities like hard work, honesty, discipline, and kindness — ideals envisioned by Nehruji. Certificates were awarded for Library Week activities conducted earlier by librarian Archana Jedhe. PTA members organised fun activities such as colouring worksheets, and quizzes and memory games. Students of Std. IX and X presented a special musical segment, blending vocal and instrumental performances. Madhura Mashankar (Std. X D), Kimaya Kubade (Std. IX C), Rudra Yadav (Std. IX B), Tejomay Oke (Std. X B), Shreyan Gaonkar (Std. IX B), Arnav Parvate (Std. X A), Chinmayee Naravane (Std. X B), Nishad Wagle (Std. X C), Samanyu Poojary (Std. IX C), Parth Phadke (Std. IX D), Sharva Pethe (Std. IX D) were the participants. The musical presentation was planned and guided by teachers Dr Vidnyapana Gokarnakar and Ms Diksha Waroshe. Headmistress Mrs Smita Biwalkar felicitated all student performers and PTA members distributed sweets as a token of appreciation.

The Secondary Section of PTV (ICSE) lit up with joy and laughter on Children's Day. Teachers crafted a heartwarming assembly that celebrated the innocence, curiosity, and boundless dreams of childhood. Principal, Dr (Mrs) Arnavaz Bhagat's words ignited sparks of kindness and creativity, while teachers along with Principal serenaded sweet songs and recited a motivational poem for students that filled every corner with warmth. The assembly also honoured the students for their excellent academic performance for the previous year. To end the day the students were taken on a Pixar movie marathon. It was a day to cherish memories, spread smiles, and honour the magic of being a child.

At PTV ICSE (Primary), the day began with a special assembly conducted by the teachers, featuring songs, performances, and heartfelt presentations that brought smiles to every child's face. Principal Dr (Mrs) Bhagat addressed the students with an inspiring story emphasising the importance of children and their growth through challenges. Headmistress Mrs Rohini Natekar followed with a heartfelt message, motivating the students to believe in themselves, embrace their strengths, and aim high in everything they do. After the assembly, students enjoyed a special screening in their classrooms, followed by fun-filled games that created lively moments and laughter all around. The celebration beautifully captured the true spirit of Children's Day—honouring the innocence, enthusiasm, and individuality of every child.

Likewise, the event at PTVA's EMS, Andheri provided a platform for students to showcase their talents, enjoy fun activities, and remember the importance of education and happiness in a child's life. In the morning assembly, the Principal Mrs Mrinalini Mhetre garlanded the photograph of Pandit Nehru and offered tribute. She greeted the students on Children's Day, quoted Nehruji's words "Children are like buds in a garden", and reaffirmed the school's commitment to their blooming to the fullest potential. The students of Std. I to IV participated in a theme-based Fancy Dress competition while the students of Std. V to IX displayed their talents in singing, dances, mimicry, instrumental music, and even in rope mallakhamb. This event was greatly supported by the parents. The innovative and thoughtfully crafted props prepared by them were appreciated by the judges and the audience. Winners of the competitions were given prizes and certificates.



पार्ले टिळक माध्यमिक



परांजपे विद्यालय




परांजपे विद्यालय

# पाटिविअच्या मराठी माध्यम आणि परांजपे विद्यालयात बालदिन जल्लोषात साजरा

